# कारशेड यादीतून ६ जागा बाद!



मटा विशेष

## मुख्यमंत्र्यांनी नेमलेल्या समितीची काट

jayant. howal
@timesgroup.com

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ प्रकल्पाच्या कारशेडसाठी मुख्यमंत्र्यांनी नियुक्त केलेल्या समितीने नऊ जागांची चाचपणी केली होती, त्यापैकी सहा जागा डेपोसाठी सर्वस्वी अशक्य असल्याचा निष्कर्ष काढला आहे. बीकेसीतील एमएमआरडीएच्या जागेच्या विकासातून भविष्यात तब्बल ३० हजार कोटी रुपयांचा महसूल मिळणार असल्याने, तर महालक्ष्मी रेसकोर्सच्या जागेवर क्रीडा विषयक उपक्रम तसेच सांस्कृतिक कार्यक्रम होत असल्याने या जागा नाकारण्यात आल्या आहेत.

याशिवाय मुंबई विद्यापीठ, बॅकबे रेक्लमेशन, मुंबई पोर्ट ट्रस्ट, धारावी, जेव्हीएलआर येथील सापुतरा नगर येथील जागाही विविध कारणास्तव अशक्यप्राय असल्याचे ठाम मत समितीच्या अहवालात नोंदवण्यात आले आहेत.

(पूर्वार्ध)

### नकाराची स्थळे व कारणे

### बीकेसी

डायमंड बोर्जसमोरील जागा एमएमआरडीएची असल्याने जमीन संपादन करणे सुलभ. परंतु या जागेवर



आंतरराष्ट्रीय वित्त संस्थेची उभारणी होणार आहे. या जागेच्या विकासातून ३० हजार कोटी रुपयांचा महसूल अपेक्षित असून, या पैशातून भविष्यातील पायाभूत सुविधा तसेच वाहतूक प्रकल्पांना निधी मिळेल.

### रेसकोर्स

जागा पुरेशी नाही. कारशेडसाठी ५०० झाडे तोडावी लागतील. येथील हेरिटेज



वास्तूंना धक्का पोहोचेल. या ठिकाणी क्रीडा उपक्रम व सांस्कृतिक कार्यक्रम होतात. भाडेपट्ट्यावरून जागा आधीच वादग्रस्त आहे.

### कालिना

विविध शैक्षणिक उपक्रम सुरू असून भविष्यात त्यात वाढ होणार असल्याने ही



जागा मुंबई विद्यापीठ देणार नाही. जागा घेण्यास विरोध होऊन प्रकल्पाला आणखी विलंब लागू शकतो.

### बॅकबे रेक्लमेशन

समुद्रात १५ ते २० हेक्टर जागेवर भराव टाकावा लागेल. ३.५ हेक्टरचा तिवरांचा पट्टा पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील. ९ हेक्टर जागेवर झोपड्या असून सुमारे ७ हजार कुटुंबांचे पुनर्वसन करावे लागेल आणि त्यासाठी एक हजार कोटी रुपये खर्च येईल. भरावासाठी सुमारे ८०० झाडे तोडावी लागतील, तर भराव



टाकण्यासाठीच तब्बल ९०० कोटी मोजावे लागतील. या सर्व कामासाठी, प्रकल्प सात वर्षे रखडेल.

### मुंबई पोर्ट ट्रस्ट

जागा अपुरी. ट्रस्टने विविध खासगी व सरकारी संस्थांना यापूर्वीच जागा भाडेतत्त्वावर दिली आहे. कमी अवधीत ही जागा ताब्यात येणे अशक्य आहे. मुळात



ही जागा मेट्रो-३च्या मार्गापासून दोन किमी अंतरावर आहे. त्यासाठी आणखी भूमिगत कॉरिडोर बांधावा लागून आर्थिक भार पडेल. भरीस भर म्हणून त्या ठिकाणी पोहोचण्यासाठी मध्य व हार्बर रेल्वेचा अडथळाही आहे.

### धारावी

मोकळी जागाच शिल्लक नाही. कारशेड उभारायचा झाल्यास १८ हजार कुटुंबांचे स्थलांतर करावे लागेल. धारावी पुनर्वसन उपक्रम राबवण्यात



आधीच कमालीच्या अडचणी असताना कारशेडसाठी जागा मिळणे सर्वस्वी अशक्य आहे.

### सारिपूत नगर, जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोड

जागा अपुरी. शिवाय पुरातत्त्व दृष्टिकोनातून महत्त्वाची महाकाली गुंफा परिसरात असल्याने या स्थळास प्रतिबंध होईल. परिसरात निवासस्थाने असल्याने जागा संपादन कठीण.

